दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www.sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
Scan QR code to visit... Epaper Portal
• (महाराष्ट्र) वर्ष ०१ ले • अंक २९९ • RNI : MAHMAR/2023/87818 • गुरूवार दि.८ ऑगस्ट२०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## रक्षाबंधनापूर्वीच बहिणींना ओवाळणी!



मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा पहिला हप्ता १७ ऑगस्टलाच मिळणार आहे. याबाबत शासन दरबारी निर्णय झालेला असून १७ ऑगस्ट रोजी राज्य सरकारकडून भव्य दिव्य कार्यक्रमाच्या माध्यमातून हे पैसे वितरीत केले जाणार आहेत. जे अर्ज पात्र झाले आहेत, अशा महिलांना ३ हजार रुपये बँक खात्यात जमा होणार आहे. त्यामुळे रक्षाबंधनापूर्वीच बहिणींना ओवाळणी मिळणार असल्याचे निश्चित झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत यावर निर्णय घेण्यात आला आहे. १७ ऑगस्ट रोजी होणाऱ्या कार्यक्रमाला एकाच मंचावरती मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री उपस्थित असणार आहेत. तर, प्रत्येक जिल्ह्यामध्ये पालकमंत्री या कार्यक्रमातून उपस्थित राहून ऑनलाईन पद्धतीने महिलांच्या खात्यात पैसे जमा होणार आहे.

# लाडकी बहीण योजनेचा हप्ता १७ ऑगस्टला मिळणार; एकदाच खात्यात ३ हजार पडणार




**मुंबई (वृत्तसंस्था)–**१७ ऑगस्टला दोन ते अडीच कोटी महिलांना पहिला हप्ता देण्याच्या संदर्भामध्ये राज्य सरकारचा विचार असल्याचीही माहिती आहे. मात्र, राज्य सरकारच्या या निर्णयामुळे योजनेसाठी पात्र झालेल्या महिला भगिनींना मोठा दिलासा मिळाला आहे.मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी १ कोटींपेक्षा जास्त अर्ज शासन दरबारी प्राप्त झाले असून या अर्जाचा ओघ अद्यापही कायम आहे. कारण, राज्य सरकारने १५ ऑगस्टची मुदत वाढवून आता ३१ ऑगस्टपर्यंत लाडक्या बहिणींना अर्ज करण्यासाठी मुभा दिली आहे. त्यामुळे, लाडकी बहीण योजनेसाठी महिलांकडून मोठ्या प्रमाणात अर्ज केले जात आहेत.तालुका, जिल्हा आणि राज्य स्तरावर महिलांच्या आलेल्या अर्जांची आकडेवारी समोर येत आहेत. त्यामध्ये, महिला भगिनींचे मंजूर अर्ज, प्रलंबित अर्ज आणि नामंजूर अर्जही देण्यात येत आहेत. तर, प्रलिंबित अर्जांमधील काही त्रुटी दुरुस्त करुन ते मंजूर केले जाणार आहेत. तर, नामंजूर करण्यात आलेल्या अर्जांना पुन्हा नव्याने अर्ज भरण्यासाठी मुदत देण्यात आली आहे.

आतापर्यंत १ कोटी ४० लाख अर्ज दाखल झाले असून त्यापैकी १ कोटी अर्जांची छानणी ही पूर्ण झालेली आहे. या योजनेचा पहिला हप्ता रक्षाबंधनच्या मुहूर्तावर दिला जाणार आहे. जुलै आणि ऑगस्ट महिन्यांचा एकत्रित हप्ता म्हणजेच ३ हजार रुपये लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात थेट १७ ऑगस्ट रोजी जमा होणार आहेत.

## थोडक्यात

### खेळाडू अपात्र झाला तर केनियाने आवाज उठवला

**मुंबई–**भारतीय कुस्तीपटू विनेश फोगाट हिला निर्धारित श्रेणीत जास्त वजन असल्यामुळे पॅरिस ऑलिम्पिकमधून बाहेर पडावे लागले. विनेश ५० किलो गटात खेळते. बुधवारी तिचे वजन १०० ग्रॅम जास्त असल्याचे आढळून आले. यानंतर तिला ऑलिम्पिक महिला कुस्तीतून अपात्र ठरवण्यात आले. भारतीय ऑलिम्पिक संघटनेने विनेशच्या अपात्रतेला दुजोरा दिला आहे.ऑलिम्पिक असोसिएशनच्या या निर्णयानंतर सुवर्णपदकाची अपेक्षा असलेल्या भारतीयांचा अपेक्षाभंग झाला आहे. दरम्यान, या मुद्द्यावरून आता इंडिया आघाडीच्या नेत्यांनी केंद्र सरकारला धारेवर धरण्याच्या प्रयत्न केला आहे. केनियाचा एक खेळाडू अपात्र ठरवला गेला तर त्याविरोधात केनिया सरकारने आवाज उठवला त्यानंतर त्या खेळाडूला पुन्हा संधी देण्यात आली. मग केनियापेक्षा भारताची ताकद नाही का, मोदी सरकार काय करत आहे, असा सवाल ठाकरे गटाचे खासदार अरविंद सावंत यांनी उपस्थित केला. यासंदर्भात संसदेत बोलू देखील दिले जात नाही, ही मोठी शोकांतिका आहे, असे सावंत म्हणाले.

### बच्चू कडू यांच्या मोर्चाला संभाजीनगर पोलिसांनी परवानगी नाकारली

**मुंबई–**आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रहार संघटनेचे नेते बच्चू कडू यांनी छत्रपती संभाजीनगर येथे भव्य मोर्चाचे आयोजन केले आहे. शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी आपण हा मोर्चा काढत असल्याचे बच्चू कडू यांनी सांगितले होते. या मोर्चाच्या माध्यमातून बच्चू कडू हे आगामी विधानसभा निवडणुकीत महायुती सोबत असतील की महाआघाडी सोबत, याचा निर्णय देखील जाहीर करणार आहेत. मात्र, आता या मोर्चाला पोलिसांनी परवानगी नाकारली असल्याचे समोर आले आहे. पोलिसांनी परवानगी नाकारली असली तरी आम्ही मोर्चा काढणारच, असा निर्धार बच्चू कडू यांनी व्यक्त केला आहे. आम्हाला कोण आडवते, ते आम्ही बघू, असा इशारा देखील त्यांनी दिला आहे.आमदार बच्चू कडू हे महायुती सोबत असले तरी देखील ते मागील काही महिन्यांपासून त्यांनी महायुती विरोधात भूमिका घेतली आहे. लोकसभा निवडणुकीत देखील महायुतीच्या उमेदवार नवनीत राणा यांच्या विरोधात बच्चू कडू यांनी स्वतंत्र उमेदवार दिला होता. त्यामुळे बच्चू कडू महायुती सोबत राहणार नाहीत, अशी शक्यता वर्तवली जात होती. आता आगामी विधानसभा निवडणुकीत देखील बच्चू कडू यांनी तिसऱ्या आघाडीचे संकेत दिले होते. राजू शेट्टी, इम्तियाज जलील, रविकांत तुपकर यांच्यासह अनेक छोट्या पक्षाच्या नेत्यांनी आता तिसऱ्या आघाडीचे संकेत दिले आहेत.

### हल्लेखोर आरोपींना मुख्यमंत्र्यांचे अभय आहे का?

**अकोला–**अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार अमोल मिटकरी यांच्या गाडीवर महाराष्ट्र निर्माण सेनेच्या कार्यकर्त्यांनी हल्ला केला होता. या हल्ल्यातील आरोपींना मुख्यमंत्र्यांचे अभय आहे का? असा प्रश्न अमोल मिटकरी यांनी उपस्थित केला आहे. यामाध्यमातून अमोल मिटकरी यांनी राज ठाकरे आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या भेटीवर देखील प्रश्नचिन्ह उपस्थित केलय. या दोघांमध्ये झालेल्या बैठकीत आमच्या विरोधात काही शिजतय का? असे देखील अमोल मिटकरी यांनी म्हटले आहे.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि राज ठाकरे यांच्यात नुकतीच बैठक झाली होती. या दोन तासांच्या बैठकीत माझ्या विरोधात काहीच शिजले का? असा प्रश्न आमदार अमोल मिटकरी यांनी उपस्थित केला आहे. अमोल मिटकरी यांच्या गाडीवर झालेला हल्ल्या प्रकरणी मुख्य सूत्रधार कर्णबाळा दुनबळे याला अटक का झाली नाही? असा प्रश्न त्यांनी विचारला आहे. या सर्व प्रकरणानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी साधी विचारपूस देखील केली नसल्याची खंत देखील त्यांनी व्यक्त केली आहे.

## डॉ.पंजाबराव देशमुख यांना भारतरत्न देण्यात यावा–आ.डॉ.फुके यांची पंतप्रधानांना विनंती

**भंडारा । प्रतिनिधी**

कृषी आणि विज्ञान क्षेत्रात संपूर्ण जगात भारताचे नावलौकिक करणारे, वंचित, शेतकरी, कष्टकरी, गरीब यांच्या कल्याणासाठी संपूर्ण आयुष्य समर्पित करणारे देशाचे माजी कृषीमंत्री भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख यांना भारतातील सर्वोच्च नागरी सन्मान भारत रत्न ने सन्मानित करण्यात यावे, अशी विनंती माजी मंत्री, आ. डॉ. परिणय फुके यांनी देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना एका पत्राच्या माध्यमातून केली आहे.



प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना लिहिलेल्या पत्रात, आमदार डॉ. फुके यांनी म्हटले आहे की, डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या कार्याची महाराष्ट्रालाच नव्हे तर संपूर्ण भारताला माहिती आहे. ते विद्वान व्यक्तिमत्व होते. भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख यांनी आपले संपूर्ण आयुष्य वंचितांच्या उन्नतीसाठी समर्पित केले. शेतकरी, मजूर आणि गरिबांच्या कल्याणासाठी त्यांनी सतत काम केले.

डॉ. फुके यांनी पुढे म्हटले आहे की, भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख हे संस्कृती आणि विज्ञानाच्या संगमाचे प्रतीक होते. ऋषीमुनींच्या परंपरा आणि शेती यांच्यात त्यांच्या व्यक्तिमत्त्वात सुसंवाद होता. ते संस्कृतचे पंडित तर होतेच, ते देशाचे कृषिमंत्रीही होते. भारतीय संविधान सभेचे सदस्य म्हणून त्यांचे योगदान महत्त्वाचे होते. विदर्भातील प्रतिष्ठित शिवाजी एज्युकेशन सोसायटी आणि सेंट्रल प्रोव्हिन्सेस फार्मर्स युनियनचे संस्थापक म्हणून त्यांचे कार्य मोठे आहे. भारत कृषक समाजाची त्यांनी स्थापना केली.

देशातील शेतकऱ्यांसाठी आयुष्य वेचणाऱ्या डॉ. पंजाबराव देशमुख यांना भारतरत्न हा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान करून देशातील कृषी आणि भूमिपुत्रांचा सन्मान करावा, अशी विनंती डॉ. फुके यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना या पत्रातून केली आहे.

## चंद्रपूर येथील ओबीसी विद्यार्थ्यांसाठी असलेले वसतिगृह १७ ऑगस्ट पासून सुरू होणार : मंत्री सुधीर मुनगंटीवार

**मुंबई । प्रतिनिधी**

चंद्रपूर येथील ओबीसी, एन. टी. ( भटक्या जमाती), एसबीसी विद्यार्थ्यांसाठी असलेले वसतिगृह उर्वरित कामे पूर्ण करून दि. १७ ऑगस्ट पासून सुरू करून तेथे विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येईल, अशी माहिती राज्याचे सांस्कृतिक कार्य, वने आणि मत्स्य व्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली. विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणीची तत्काळ सोडवणूक केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.



मंत्रालयातील परिषद सभागृहात ओबीसी, एन. टी. ( भटक्या जमाती), एसबीसी विद्यार्थ्यांच्या मागण्या संदर्भात आज ०७ ऑगस्टला बैठक झाली. यावेळी सामाजिक न्याय, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद सिंगल, विभागाचे अन्य वरिष्ठ अधिकारी आणि ओबीसी सेवा संघाचे चंद्रपूर जिल्हाध्यक्ष प्रा.अनिल आनंदराव डहाके, श्री. देवा माधव पाचभाई, गोमती मनोहर पाचभाई यांच्यासह अन्य प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

मंत्री मुनगंटीवार म्हणाले की, विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या चांगल्या सुविधा मिळाव्यात, त्याचबरोबर त्यासाठीचे सुयोग्य वातावरण मिळावे, याकडे लक्ष दिले पाहिजे. त्यामुळेच विद्यार्थ्यांची निवासी व्यवस्था चांगली असली पाहिजे. त्यामुळे तत्काळ वसतिगृहातील सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. त्याठिकाणी विद्यार्थी प्रवेश सुरु करावेत, अशा सूचना त्यांनी दिल्या.

वसतिगृह प्रवेशासाठी बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्याचे बंधन नाही. याबाबत विभागाच्या वतीने स्पष्ट कल्पना जिल्हा आणि तालुका पातळीपर्यंत विभागाने पोहोचवावी. विद्यार्थ्यांना याबाबत अडचण येऊ नये, अशा स्पष्ट सूचना मंत्री श्री. मुनगंटीवार यांनी दिल्या.

यावेळी कनिष्ठ महाविद्यालयीन ओबीसी, एन. टी. ( भटक्या जमाती), एसबीसी विद्यार्थ्यांसाठी स्वाधारच्या धर्तीवर आधार योजना सुरू करावी, ओबीसी विद्यार्थिनी प्रमाणे विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणात १०० टक्के सवलत मिळावी, विद्यार्थ्यांना प्री मॅट्रिक शिष्यवृत्ती मिळण्याबाबत विभागाने कार्यवाही करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

अनुसूचित जातीसाठी असलेल्या विद्यार्थी वसतिगृहात ओबीसी विद्यार्थ्यांचा कोटा कमी करण्यात आलेला नाही. याबाबत विद्यार्थ्यांच्या मनात असलेला संभ्रम विभागाने तत्काळ दूर करावा, असे निर्देशही त्यांनी दिले. या मुद्द्यांसह ओबीसी विद्यार्थ्यांसाठीच्या सर्वच योजना जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी विभागाने जाहिराती व सोशल मिडियाच्या माध्यमातून मोहिम राबवावी अशी सूचनाही त्यांनी यावेळी केली.यावेळी, मंत्री सावे म्हणाले की, चंद्रपूर येथील वसतिगृहात फर्निचर सह सर्व सुविधा उपलब्ध करून १७ ऑगस्ट पूर्वी ते सुसज्ज केले जाईल. याशिवाय, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर येथील वसतिगृहातही विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येईल.प्रधान सचिव श्रीमती विनिता वेद सिंगल यांनी, विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने जे धोरणात्मक निर्णय आहेत, ते उच्च स्तर समिती आणि मंत्रिमंडळासमोर आणून त्यास मंजुरी घेतली जाईल, असे सांगितले.

## अथर्व जुनघरे सनदी लेखापाल

**झडशी (वार्ताहर)–**भारत सरकारच्या कार्पोरेट व्यवहार मंत्रालयाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असलेली भारतातील सर्वात मोठी व्यावसायिक लेखा संस्था इन्स्टिटच्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटट्स ऑफ इंडिया द्वारा घेतल्या गेलेल्या सनदी लेखापाल च्या अंतिम परीक्षेत अथर्व हेमंतराव जुनघरे ह्याने सुयश मिळवत सी.ए. म्हणून मानाचा तुरा रोवला. अथर्व चे वडील हेमंत जुनघरे हे वर्धा जिल्हा परिषदेमध्ये शिक्षक असून आई सांगितताई हया गृहिणी आहेत. या यशाचे श्रेय त्याने आई वडील आणि मार्गदर्शक करणाऱ्या शिक्षकांना दिले आहेत. सर्वच स्तरातून त्याचे अभिनंदन करण्यात येत आहे.



## जिल्हाधिकाऱ्यांनी केली कन्नड तालुक्यात पिक पाहणी व साधला विद्यार्थ्यांशी संवाद

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज कन्नड तालुक्यात पिक स्थिती पाहणी, विहिर पुनर्भरण कार्यक्रम, मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना नोंदणी इ. कामांची पाहणी केली व विद्यार्थ्यांसी संवादही साधला.

जिल्हाधिकारी स्वामी आज कन्नड तालुका दौऱ्यावर होते. महसूल पंधरवडा निमित्त जिल्ह्यामध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन महसूल प्रशासनाने केले आहे. त्यानिमित्त आज कन्नड तालुक्यातील विविध ठिकाणी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी भेट दिली. शिवराई येथे विहीर पुनर्भरण कामाची पहणी,आणि पिकाची पाहणी केली. कन्नड नवोदय विद्यालयात भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. कुंजखेडा येथे रोजगार हमी योजनेअंतर्गत वृक्षारोपण कार्यक्रम सहभाग घेऊन युवा संवाद कार्यक्रमात जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी युवकांशी संवाद साधला. कन्नड तहसिलदार कार्यालय येथे महसूल प्रशासनामध्ये राबविण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील नोंदणी कामाच आढावा घेतला. आगामी काळामध्ये पाण्याची टंचाई भासू नये यासाठी पाणी संरक्षित करण्याचे निर्देश संबंधित तहसिलदार यांना दिले. यावेळी उपविभागीय अधिकारी संतोष गोरड, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी ,नवोदय विद्यालयाचे मुख्याध्यापक देशमुख, नगरपालिका मुख्याधिकारी नंदकिशोर भोंबे यांच्यासह वनविभागाचे अधिकारी व तहसील कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते .

## ट्रक –दुचाकीच्या अपघातात वृत्तपत्र विक्रेत्याचा जागीच मृत्यू

### भद्रावती शहरातील घटना

**भद्रावती । प्रतिनिधी**



आपल्या दुचाकीने सकाळी वृत्तपत्र वितरणाचे काम करीत असताना ट्रकने दुचाकीला जबर धडक दिल्याने झालेल्या अपघातात शहरातील एका वृत्तपत्र विक्रेत्याचा घटनास्थळीच मृत्यू झाल्याची घटना दिनांक ७ रोज बुधवार ला सकाळी ९.१५ वाजता शहरातील चंद्रपूर–नागपूर हायवे वरील उडान पुलाजवळ घडली. ज्ञानेश्वर एकनाथ इंगोले, वय ५० वर्ष, राहणार शास्त्रीनगर, भद्रावती असे या मृत वृत्तपत्र विक्रेत्याचे नाव आहे. घटनेची माहिती मिळताच भद्रावती पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला व मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालयात पाठविला. सदर मृतक हा गेल्या वीस वर्षांपासून वृत्तपत्र विक्रेता म्हणून काम करीत होता. घटनेच्या दिवशी मृतक हा नेहमीप्रमाणे आपल्या दुचाकीने सकाळी वृत्तपत्र वितरण करीत असताना उडान पुलाजवळ नागपूर वरून चंद्रपूरकडे जाणाऱ्या केमिकल भरलेल्या ट्रकने दुचाकीला जबर धडक दिली. यात ज्ञानेश्वर इंगोले यांचा घटनास्थळीत मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूमुळे शहरात सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

## रंजना मदनकर यांचे निधन



**नागभीड । प्रतिनिधी**

भारतीय स्टेट बँकेचे सेवानिवृत्त कर्मचारी श्री रुपरावजी मदनकर यांची पत्नी श्रीमती रंजना रूपराव मदनकर यांचे हृदयविकाराच्या तीव्र धक्क्यानेआज दिनांक ७ऑगस्ट२०२४ ला रात्री २.०० वाजता दुःखद निधन झाले त्यांचे अंतिम संस्कार ४ वाजता करण्यात आले त्यांच्या पश्चात पती, मुलगा, मुलगी ,सून जावई नातू असा आता परिवार आहे.

## राजू शेट्टी यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता

**मुंबई–**बांगलादेशमध्ये सुरू असलेल्या प्रकारावर माजी खासदार राजू शेट्टी यांनी वादग्रस्त वक्तव्य केले होते. बांगलादेश कडून आपण काहीतरी शिकायला हवे. आपण आपल्या पंतप्रधानाला पळवून का लावू शकत नाही? असा सवाल त्यांनी उपस्थित केला होता. मात्र, त्यांच्या या वक्तव्यावर आता भाजपने आक्षेप घेतला आहे. भाजप नेत्या नीता केळकर यांनी राजू शेट्टी यांच्या विरोधात विश्रामबाग पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. राजू शेट्टी यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा नोंद करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. त्यामुळे आता राजू शेट्टी यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता वर्तवली जात आह



# स्त्री–पुरुष सर्वांचा आंदोलनात सहभाग!

**आजच्या दिवशी– दि.८ ऑगस्ट १९४२रोजी रात्रीपासूनच भारतीय स्वातंत्र्य लढ्याची मनसुबे तयार झालीत. महात्मा गांधीजींनी छोडो भारत व करेंगे या मरेंगेचा नारा दिला होता. यामुळे संपूर्ण देश पेटून उठला. शांततेच्या मार्गाने स्वातंत्र्याचे आंदोलन करणार्या काँग्रेस आणि नेत्यांनी प्रथमच क्रांतीची भाषा वापरली होती. त्यामुळे हा क्रांतीदिन म्हणून पुढे ओळखला जाऊ लागला. ८ ऑगस्ट हा दिवस भारतीय स्वातंत्र्याच्या लढाईतील शेवटचा दिवस म्हणूनही स्मरण केला जातो. म.गांधींच्या नेतृत्वात भारत छोडो आंदोलनाला या दिवशी सुरुवात झाली होती. त्यानंतर ९ ऑगस्ट रोजी गांधींसह ज्येष्ठ नेत्यांना अटक करण्यात आली होती. त्यामुळे संपूर्ण भारत इंग्रजांविरुद्ध एकवटला होता. देशावासियांच्या या एकजुटीने इंग्रज सरकारला गुडघे टेकायला भाग पाडले. त्यामुळे भारताच्या स्वातंत्र्यानंतर क्रांती दिन साजरा केला जाऊ लागला. मुंबईतील ज्या मैदानावर झेंडा फडकावत या आंदोलनाला सुरुवात झाली होती. त्या मैदानाला क्रांती मैदान हे नाव देण्यात आले आहे. भारतीयांनी पुकारलेला सन १८५७ नंतरचा हा सर्वात मोठा स्वातंत्र्य लढा होता. आज आपल्या देशासाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या सर्व नाम–अनाम क्रांतीकारकांना विनम्र अभिवादन करुयात! असा हा श्रीकृष्णदास (बापू) निरंकारीजींचा प्रेरणादायी लेख.... संपादक.**

देशभरात ब्रिटिश सत्तेला हाकलून लावण्यासाठी पुढे आंदोलनांना सुरवात झाली. ब्रिटिश सत्ता पार हादरून गेली होती. हे रोखायचे कसे? असा प्रश्न त्यांना पडला होता. अशात हे आंदोलन देशभर पसरणार म्हणून ९ ऑगस्टच्या पहाटेच म.गांधी, पंडित नेहरू, वल्लभभाई पटेल, मौलाना आझाद यांच्यासह अनके काँग्रेस नेत्यांना पकडून तुरुंगात टाकण्यात आले. भारतीय जनमानसात असंतोषाचा विस्फोट झाला, त्यामुळे ब्रिटिश शासन भयभीत झाले. एकाच वेळी देशभर कारवाया सुरू झाल्या व महत्त्वाच्या कार्यकर्त्यांना अटक सत्र सुरू केले अनेक नेते भूमिगत झाले. देशभर पोलीस ठाण्यावर व मामलेदार कचेरीवर, सरकारी कार्यालयांवर मोर्चे निघू लागले. युवक हातात तिरंगा झेंडा घेऊन घोषणा देत लाठीचार्ज व गोळीबार झेलत धैर्याने तिरंगा फडकवू लागले. समाजवाद्यांनी भूमिगत कारवायांवर लक्ष केले. रेल्वे स्थानके मोडतोड, रूळ उखडणे, पोस्ट कार्यालय जाळणे, वीज तोडणे, गनिमी पद्धतीने ही कामे सुरू झाली. पोलिसांकडून अटक सत्र सुरू झाले. व्यापारी, विद्यार्थी, नोकरदार, सामान्य नागरिक, स्त्री–पुरुष सर्व या आंदोलनात सहभागी झाले. देशभरातील युवकांनी यात भाग घेतला. देशाच्या स्वातंत्र्यासाठी स्फूर्तीदायी ठरलेल्या या दिवसाची आठवण तसेच नव्या पिढीला क्रांतिकारकांच्या त्यागाची जाणीव रहावी, यासाठी दरवर्षी ९ ऑगस्ट रोजी क्रांतीदिन साजरा केला जातो.

देशभर स्वातंत्र्याचे व देशभक्तीचे वातावरण निर्माण झाले होते. चले जावमुळे क्रांतिसिंह नाना पाटील यांनी महाराष्ट्रात प्रतिसरकारची स्थापना केली. हे आंदोलन उभे राहण्याआधीच ब्रिटिश सरकारने मोडून काढण्याचे ठरवले होते. त्या पद्धतीने देशभर कारवाया केल्या व आंदोलन मोडून काढले. परंतु या आंदोलनाने जगाला वेगळी ओळख दिली. कारण



श्री कृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरूजी.
मु.पो.ता.जि.गडचिरोली
दूरभाष– ७७७५०४१०८६.

कोणताच सेनापती नसताना स्वातंत्र्याचे युद्ध जनतेने हातात घेतले होते. यामुळेच भारताच्या स्वातंत्र्याचा विचार केला जाऊ लागला, हे विशेष. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात दि.९ ऑगस्ट १९४२ या दिवसाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. या दिवशी तत्कालीन काँग्रेसच्या नेतृत्वाने भारतातील इंग्रज सरकारला चले जावचा इशारा दिला. या दिवसापासून स्वातंत्र्यासाठी लढणार्या भारतीयांनी करेंगे या मरेंगे अशी निर्वाणीची भूमिका घेतली. इंग्रजांना छोडो भारत हा अखेरचा इशारा दिला होता. या आंदोलनाला गांधीजींनी अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या मुंबई अधिवेशनात सुरूवात केली होते. यामुळे जणू एक क्रांतीची जोतच पेटली होती. त्यामुळे या दिवसाचे औचित्य साधून स्वातंत्र्य लढ्यात आपले योगदान देणाऱ्या सर्व थोर पुरूषांना विनंम्र अभिवादन!

देशभरात ऑगस्ट क्रांती दिन साजरा होत आहे. इंग्रजांनी भारताला स्वतंत्र करण्यासाठी दिलेला शब्द न पाळल्यामुळे या आंदोलनाला सुरुवात झाली होती. ८ ऑगस्ट १९४२ रोजी भारताला स्वतंत्र करणार असल्याचे इंग्रजांनी म्हटले होते. मात्र ऐनवेळी इंग्रजांनी भारताला स्वातंत्र्य देणार नसल्याचे सांगितले. त्यामुळे म.गांधींनी देशभर ऑगस्ट क्रांती आंदोलनाची घोषणा केली. या आंदोलनाला भारत छोडो, असे नाव देण्यात आले होते. करो या मरो, अशी या आंदोलनाची घोषणा होती. शांततेच्या मार्गाने स्वातंत्र्याचे आंदोलन करणाऱ्या काँग्रेस आणि थोर नेत्यानी प्रथमच क्रांतीची भाषा वापरली होती. त्यामुळे ९ ऑगस्ट हा दिवस क्रांतिदिन म्हणून ओळखला जाऊ लागला. मात्र, इतकी कठोर भूमिका घेतल्या नंतर पाच वर्षानी आपल्याला स्वातंत्र्य लाभले. दि. ९ ऑगस्ट १९४२ ते १५ ऑगस्ट १९४७ हा कालावधी प्रत्येक भारतीयाने लक्षात ठेवायला हवा, इतका तो ऐतिहासिक आणि महत्त्वाचा आहे. दरम्यान, गांधींच्या नेतृत्वात इंग्रज सरकारविरुद्ध फार मोठ्या प्रमाणावर देशभर अहिंसक जनआंदोलन लवकरच उभे राहील, अशा शब्दांत महासमितीने आपला निर्धार व्यक्त केला होता. त्यामुळेच गांधी, पंडित नेहरू, मौलाना आझाद, सरदार वल्लभभाई पटेल, अशा ज्येष्ठ नेत्यांना ९ ऑगस्टच्या पहाटेच इंग्रज सरकारने अटक करून अज्ञातस्थळी रवाना केले होते. सरकारने त्यांना कुठे ठेवले ह्याची गुप्तता पाळली होती. मात्र, तरी बातमी फुटलीच. गांधीजींना पुण्यात आगाखान पॅलेसमध्ये आणि नेहरू, पटेल, आझाद या मंडळींना अहमदनगरच्या किल्ल्यात ठेवण्यात आल्याचे समजले. देशभर जागोजागी हरताळ, मिरवणुका, मोर्चे यांना ऊत आले. सरकारने लोकांना एकत्र जमण्यास बंदी घातली. पण लोक आता आदेश मानायला तयार नव्हते. पोलिसांच्या लाठीहल्ल्याला, गोळीबाराला जुमानत नव्हते. जाळपोळ, पोलिसांचे खून, टेलिफोन व तारा कापणे असे प्रकार सुरू झाले. यासर्व प्रकाराला सरकारने गांधीजींना जबाबदार ठरवले. त्याचा निषेधार्थ गांधीजीने २१ दिवसांचे अंदोलनही केले होते. प्रतिसरकारमुळे मूळ सरकार खवळेले आणि त्यांनी दडपशाही सुरू केली. त्यात हजारांहून अधिक मृत्यू, तितकेच जखमी, महिलांची विटंबना तर लाखोंना अटक केली होती, अशा नोंदी आहेत. ही चळवळ युद्धासारखी होती. या लढाईत योगदान देणाऱ्या सर्व प्रकारच्या क्रांतिलढ्यांना वंदन!

दुसऱ्या महायुद्धात भारताने इंग्रजांना मदत केली. त्यावेळी इंग्रजांनी भारत सोडून जाण्याचे वचन दिले होते. मात्र ऐनवेळी दिलेला शब्द न पाळता इंग्रजांनी भारताला स्वातंत्र्य देण्यास नकार दिला. त्यामुळे दि.८ ऑगस्ट १९४२ रोजी भारतीय काँग्रेस कमिटीच्या मुंबईतील अधिवेशनात भारत छोडो आंदोलनाचा प्रस्ताव संमत करण्यात आला. त्यानंतर इंग्रजांनी गांधींजींना पुण्यातील आगा खाँ तुरुंगात कैद केले. तसेच, स्वातंत्र्य चळवळीतील इतर नेत्यांनाही अटक करण्यात आली. त्यावेळी तरुण कार्यकर्त्या अरुणा असिफ अली यांनी ९ ऑगस्ट रोजी मुंबईतील ग्वालिया टँक मैदानात तिरंगा फडकावत भारत छोडो आंदोलनाचा शंखनाद केला. मात्र, गांधीजींनी हेही आंदोलन अहिंसक मार्गानेच करावे, असे आवाहन देशवासियांना केले होते. तरीही देशातील अनेक भागात हिंसा आणि तोडफोड करण्यात आली होती. दुसऱ्या महायुद्धामुळे ब्रिटीश सरकार अगोदरच खिळखिळे बनले होते. तर या आंदोलनामुळे ब्रिटीशांची उरली–सुरली ताकदही लोप पावत गेली. त्यानंतर देशवासियांनी इंग्रजांना हाकलून लावेपर्यंत हे आंदोलन सुरुच ठेवले. भारताला दि.१५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. या आंदोलनात आपले बलिदान देणाऱ्या नागरिकांना श्रद्धांजली म्हणून हा ऑगस्ट क्रांती दिन साजरा केला जातो.

!! ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त सर्व देशप्रेमी भारतीयांना वंदे मातरम् !!

# नागपंचमी आणि नाभिक समाज...

श्रावण महिना म्हणजे सणांचा महिना.आणि श्रावणातील पहिला सण 'नागपंचमी'चा. आपल्या कुटुंबाची नाग भयापासून सदासर्वकाळ मुक्तता व्हावी व नागदेवतेचा कृपाशीर्वाद घरातील सर्वांना प्राप्त व्हावा,यासाठी प्रतिवर्षी श्रावण शुक्ल पक्ष पंचमीला म्हणजेच नागपंचमीला महाराष्ट्रात नाग देवतेचे घरोघरी पूजन केले जाते.या दिवशी घरातील स्त्रिया नवीन अलंकार,नवीन वस्त्र परिधान करून मनोभावे नागाची पूजा करतात.घरामधे नागाची प्रतिमा अथवा जिवती(प्रतिमा) लाऊन महिनाभर पूजा अर्चा केली जाते.नागपंचमीचा सण हा विशेष करून स्त्रियांचा सण.पुराणातील विविध प्रचलित कथांनुसार हा सण राज्यभर विविध भागात वेगवेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो.परंतु मुख्य उद्देश मात्र एकच असतो आणि तो म्हणजे नाग भयापासून मुक्तता आणि नागाचे संवर्धन.




या दिवशी महिला काही तळत,भाजत अथवा कापत नाहीत.यामागे मुख्य हेतू हाच असतो की,घरातील गृहिणीला किमान या निमित्ताने एक दिवस तरी आराम मिळावा.तसेच अनवधानाने नागाला काही ईजा होऊ नये म्हणून शेतकरी देखील आपली सर्व शेतातील कामे बंद ठेवतात.

थोडक्यात सांगायचे झाले तर आज एकविसाव्या शतकात देखील राज्यभर हा सण मोठ्या आनंदाने आणि भक्तिभावाने साजरा केला जातो.

आपल्या राज्यातील नाभिक समाजासाठी या सणाचे अनन्यसाधारण महत्व आहे.

नाभिक समाजाच्या आराध्य दैवत संत शिरोमणी सेनाजी महाराज यांच्या पुण्यतिथी प्रमाणेच नागपंचमीचा सण देखील नाभिक बांधव मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करतात.

नाभिक पुराण या अतिप्राचीन ग्रंथानुसार नाभिक म्हणजेच शेषनाग,

न्हावी हा शेषनागाचाच अवतार.

या ग्रंथामधील कथेनुसार नाभिकाची उत्पत्ती म्हणजेच न्हाव्याची उत्पत्ती ही भगवान शंकराच्या नाभीतून झालेली आहे.

जेंव्हा सृष्टीची निर्मिती झाली तेंव्हा पृथ्वीवर महा प्रलय होता.सर्वत्र पाणीच पाणी आणि अंधार पसरलेला होता. तेव्हा भगवान शंकराने आपला तिसरा डोळा उघडून तो प्रलय थांबवला.

या नंतर पृथ्वीवर समुद्र,पर्वत व नद्यांची निर्मिती केली,तर आकाशात चंद्र, सूर्य, तारे आणि नक्षत्रांची स्थापना केली. भगवान शंकराच्या कृपेने विष्णूच्या नाभीतून ब्राह्मणाची उत्पत्ती झाली. तो चतुर्मुख होता. त्या ब्राह्मणाला शंकराने सृष्टीची निर्मिती करण्यास सांगितले. तेव्हा विष्णूने शंकराला सांगितले, की ब्राह्मणाचे मुंजबंधन झाल्याशिवाय त्यास ब्राह्मणत्व प्राप्त होणार नाही. मुंजसाठी जानवे व शिखाची गरज होती. शिखाचे काम कोणी करावे, हा प्रश्न निर्माण झाला. शिखा प्राप्त होण्यासाठी नाभिकाची निर्मिती आवश्यक होती. तेव्हा भगवान शंकराने आपल्या कंठातील शेषाला स्वत:च्या नाभीकमलातून जन्म घेण्यास सांगितले.सुरुवातील शेषाने भगवंतापासून दूर व्हावे लागेल म्हणून विरोध केला आणि भगवान शंकराला विचारले, की जन्मानंतर मला कशाची प्राप्ती होईल?'

यावर भगवान शंकर उत्तरले, तुला सर्व कामांत मोठा मान सन्मान प्राप्त होईल. तुझ्याशिवाय ब्राह्मणाला ब्राह्मणत्व प्राप्त होणार नाही. तु सर्वांचा आवडता होशील व श्रावण महिन्यातील नागपंचमीस तुझे घराघरात पूजन केले जाईल. स्त्रियांचा तू भाऊ होशील. तुझ्या वंशात उत्पन्न झालेल्या सर्वांना मान देतील.भगवान शंकर आणि विष्णूच्या या विनंती नुसार अखेर शेषाने शंकराच्या नाभीतून मनुष्यरूपाने जन्म घेतला. नाभीच्या कुंडलीनितून जन्म घेतल्यामुळे त्याचे गोत्र कौंडील्य झाले आणि शेषाचाच अवतार असलेल्या भगवान शंकराच्या नाभीतुन जन्म घेतल्यामुळे शेष नागास मनुष्य अवतारात नाभिक हे नाव प्राप्त झाले. म्हणूनच शेषनागाला नाभीकाचा वंशज म्हणतात.

नाभिकाचा जन्म तर झाला पण त्याला ब्रह्मदेवाची मुंज करण्यासाठी क्षुरा म्हणजेच हत्यार नको का?तेंव्हा भगवान शंकराने आपल्या अंत:करणातील पाचव्या सूक्ष्म वेदाला पाचारण केले व त्यापासून तात्काळ मंत्रमय क्षूरा तयार केला.हे झाले नाभिकाचे हत्यार..

त्यानंतर याच हत्याराच्या साहाय्याने नाभीकाने ब्रम्हाची शेंडी राखली आणि त्यानंतर ब्रह्मदेवाचे मौजिबंधन संपन्न झाले.

अशारीतीने नाभिक पुराण या ग्रंथानुसार शेषनाग हा सकल नाभिक समाजाचा पूर्वज ठरतो.म्हणूनच या नागराजाचा नागपंचमी हा सण राज्यातीलच नव्हे तर देशभरातील नाभिक समाज बांधवांसाठी पवित्र मानला जातो.

याच कारणामुळे सर्व नाभिक समाज या दिवशी आपल्या पारंपरिक व्यवसायाचे सलून आणि दैनंदिन व्यवहार बंद ठेवून नागराजाची भक्ती भावाने पूजा करून नैवद्य अर्पण करतात आणि आपल्या पूर्वजाचे स्मरण करून आनंद साजरा करतात.

**–संजय पंडित**

# बहुआयामी व्यक्तिमत्व

# डॉ.शैलेन्द्र लेंडे

मराठी साहित्यविश्वातील महत्त्वाचं नाव ! साक्षेपी समीक्षक , उत्कृष्ट वक्ते , स्वतंत्र विचारकर्ते अशा बहुविध वैशिष्ट्यांनी युक्त असलेले व्यक्तिमत्त्व म्हणजे शैलेन्द्र लेंडे ! रा . तु .म. नागपूर विद्यापीठ , नागपूर येथील मराठी विभागातील एकमेव प्रोफेसर म्हणजेच शैलेन्द्र लेंडे !

मितभाषी व मृदुभाषी , सयंमी आणि समजदार व्यक्तित्वाचे धनी ; शैलेन्द्र यांनी अल्पावधीतच स्वतःला सिद्ध केले आहे . आपल्या मित्रांमध्ये स्वतःच्या विद्वत्तेचे प्रदर्शन त्याने कधी केले नाही . एम.ए. च्या वर्गात असणाऱ्या ( ९२ -९४) ह्या काळातील मित्रांना शैलेन्द्र , आपलासा आणि जिव्हाळ्याचा वाटतो ; हेच त्याचे वैशिष्ट्य आहे !



मला आरमोरीहून सुरेश खोंड सरांनी नागपूर विद्यापीठातील मराठी विभागात प्रवेश घ्यावा , असे सुचविले आणि मी नागपूर गाठले . तसेच शैलेन्द्रच्या भंडाऱ्याच्या सुमंत देशपांडे सरांनी नागपूर विद्यापीठात एम .ए. करावे , असे सांगितले . त्या काळात यशवंत मनोहर , द .भि. कुलकर्णी , आशा सावदेकर , म .शं. वाबगावकर ही दिग्गज मंडळी मराठी विभागात होती . मॉरिश कॉलेजमध्ये ग्रेस शिकवत होते .

शैलेन्द्र , शांत स्वभावाचा व अभ्यासू असल्यामुळे तो सर्वांचा आवडता मित्र बनला . तसेही आम्ही विदर्भाच्या कानाकोपऱ्यातून सगळे एकत्र आलो होतो . कल्पना पांडे , नीता लामकाणे , उज्ज्वला वंजारी , दीपाली कोलते , सपन नेहरोत्रा , हेमंत देशमुख , यशवंत घुमे , बबन राऊत, वसंत फुसे , राजेश देशपांडे , प्रशांत शेळके ,सुदर्शन दिवसे असे मित्र – मैत्रिणी एकत्र आलो होतो . काही महिन्यांपूर्वी आमच्या बॅचचे गेट– टू – गेदर ( स्नेहसंमेलन ) झाले . कृष्णा झाडे हा फार हिलमिल्या स्वभावाचा होता . शैलेन्द्रने मराठी विभाग सज्ज करून दिला . तब्बल ३० वर्षांनंतर आम्ही एकत्र आलो होतो ; ते केवळ सपन नेहरोत्रा ,नीता आणि शैलेन्द्र यांच्यामुळे !

शैलेन्द्र , आपले लेखन आणि व्याख्यान धारदार करण्याकरिता खूप मेहनत घेतो . यशवंत मनोहरांच्या तालमीत तयार झाल्यामुळे आंबेडकरवादाचा प्रभाव त्याच्यावर आहे ; तरीही त्याची विचार करण्याची स्वतंत्र पद्धती आणि विचारधारा आहे . कंपुबाजी त्याच्या स्वभावात नाही . एखाद्या विषयावरील त्याचे लेखन आणि वक्तृत्त्व केवळ श्रवणीयच नव्हे , तर विचारप्रवर्तक असते . होतकरू आणि गरीब विद्यार्थी यांच्याबद्दल त्याच्या मनात समानत्वाचा धागा जुळलेला आहे . साहित्य / संस्कृती / समाज / राजकारण / अर्थकारण / धर्मकारण / नीती शास्त्र ह्यावर दांडगा अभ्यास आहे . जीवनाच्या विविध क्षेत्रात आपण कसे वर्तन करावे , चळवळीसाठी कार्य करावे ; अशी त्याची इच्छा बघितली आहे . खूप धडपड्या व्यक्तिमत्त्व म्हणून शैलेन्द्रचे नाव घेता येते . आगरकरांवरील पीएच. डी.चा ग्रंथ , विवेकवादावरील पुस्तक आणि यशवंत मनोहरांवरील पुस्तक प्रकाशित आहेत !

शैलेन्द्र , विद्यार्थीदशेत कविता लिहायचा , त्याची आणि माझी कविता ९४च्या 'समुचित'च्या एका अंकात आल्या होत्या . पुढे त्याची कविता सुटली ; ती कायमचीच ! मात्र , गंभीर आणि वैचारिक लेखनाचा वारसा त्याने जपला . मला कवितेने बांधून टाकले ; हे मात्र खरे !

त्याचे वडील धर्मदास लेंडे यांना गीतकार शैलेन्द्र आवडायचे . म्हणून त्याचे नाव शैलेन्द्र ठेवले ! घरचे नाव अभय ! आणि भाऊ अजय ! त्याचे वडील मुख्याध्यापक आणि आई शिक्षिका होती . खमारी ( बुटी ) हे त्याचे जन्मगाव ! जे विद्याधर बनसोड ( चंद्रपूर ) यांचेसुद्धा ! भंडारा आणि गडचिरोली म्हणजे भातपट्टा! शैलेन्द्र जेव्हा पुलगावला यायचा तेव्हा मासोळी आवर्जुन खायचो . माझ्या लग्नात शैलेन्द्र दोन – तीन दिवस सोबत राहिला . दादा आणि आई गेली तेव्हा तो आला होताच ! प्रदीप मेश्राम , मिलिंद साठे सोबत होते .

शैलेन्द्रने सामाजिक बांधीलकी जोपासली आहे . विद्यार्थिप्रिय शिक्षक म्हणून त्याचा लौकिक आहे . विभागात एकटा असूनही सर्व प्राध्यापकांना सोबत घेऊन कार्य करण्याची वृत्ती शाबूत आहे .

आज , त्याचा वाढदिवस !

त्यानिमित्ताने मनापासून खूप खूप शुभेच्छा !

त्याच्या हातून भरीव कार्य होवो,

ही अपेक्षा !

**–डॉ.भूषण रामटेके,पुलगांव**

# भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतील सुवर्ण पान : ऑगस्ट क्रांती दिन

भारत छोडो आंदोलन किंवा ऑगस्ट क्रांती हे ऑगस्ट १९४२ मध्ये संपूर्ण स्वराज्यासाठी सुरू झालेले नागरी असहकार आंदोलन चले जाव चळवळ होते. गांधीजींच्या करा किंवा मरा ह्या संदेशाने या आंदोलनाची सुरुवात झाली होती. मुंबई येथे ८ ऑगस्ट १९४२ रोजी महात्मा गांधींनी भारत छोडोचा नारा देऊन ब्रिटीशांविरोधात स्वातंत्र प्राप्तीसाठी आंदोलन उभारले होते. महात्मा गांधींजीसह काँगेस श्रेष्ठींना ९ ऑगस्ट १९४२ रोजी भारत छोडो आंदोलनाचा एक भाग म्हणून अटक करण्यात आली होती. या आंदोलनाचा गुप्त मसुदा सेवाग्राम येथे ९ जुलै रोजी बापुकुटीतील आदी निवासात तयार करण्यात आला होता आणि १५ जुलै रोजी काँग्रेस कार्य समितीतर्फे त्याला अंतिम स्वरूप देण्यात आले होते. त्या मसुद्याला पुढे वर्धा ठराव म्हणून मान्यता देण्यात आली आणि ९ जुलै २०१८ रोजी चले जाव चळवळीचा ७५ वा वर्धापन दिन संपन्न झाला. १९४२ साली याच तारखेला महात्मा गांधी यांनी ब्रिटीशांना चले जावचा आदेश दिला आणि त्या आदेशाने भारतातली जनता पेटून उठली. तिने उत्स्फूर्तपणे गावागावात सरकारच्या विरोधात आंदोलन केले. ह्या आन्दोलनाचे प्रतिसाद शहरी भागासह ग्रामीण भागातही पसरले. तत्कालीन ग्रामीण भागातील अग्रनी कार्यकर्ते असणारे बुलडाणा जिल्ह्यातील, नागझरी गावचे रखमाजी कायंदे (सावकार) यांनी शेकडो कार्यकर्ते आपल्या स्वखर्चाने मुंबईला आंदोलनात सहभागी केले होते. सेवाग्राम येथे झालेल्या या मसुदा बैठकीत जनआंदोलनाचे नियम, आंदोलन पुढे नेण्याचे सर्व अधिकार महात्मा गांधींकडे देण्यात येत असल्याचे यावेळी ठरविण्यात आले होते.



प्रविण बागडे
नागपूर
९९२३६२०९१९

आत्मक्लेश करणारी व्यक्ती क्रांतिकारक अशी व्यक्ती असते. क्रांतिकारक हा शब्द विशेषण म्हणून वापरला जाऊ शकतो; समाजावर किंवा मानवाच्या काही पैलूंवर मोठा प्रभाव पडतो, कारण त्याला सर्वस्वी ठरविले जाते. 'क्रांतीकारी' याचा अर्थ असा क्रांतिकारी आहे जो एखाद्या व्यवस्थेविरुद्ध बंड करतो किंवा अन्याय, हिंसा किंवा काहीतरी चुकीचे आणि अस्वीकार्य अशा निर्णयाविरुद्ध बंड करतो. क्रांतीकारी ही अशी व्यक्ती आहे जी एकतर विद्रोह करते किंवा सद्य परिस्थितीत बदल घडवून आणण्यासाठी त्याचे समर्थन करते.

या ऐतिहासिक 'चले जाव' आंदोलनात ८ ऑगस्ट रोजी गोवालिया टँक मैदानावर 'वंदे मातरम्' हे प्रेरणादायी, वंदनीय गीत संपूर्ण कडव्यांसहीत संगीतकलानिधी मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर उर्फ मास्तर कृष्णराव यांनी झिंझोटी रागात तयार केलेल्या स्वकृत चालीत गाऊन सादर केले. यावेळी पेटून उठलेल्या भव्य जनसमुदयासमोर हे तेजस्वी गीत गाण्यासाठी प्रसिद्ध गायक व कट्टर देशभक्त असलेल्या मास्तर कृष्णरावांचीच निवड करण्यात आली होती. या गीतावर इंग्रजांनी बंदी घातलेली असताना स्वतःच्या जीवाची पर्वा न करता या गीताचे संपूर्ण कडव्यांसहित जाहीर गायन करणे हे फार मोठे धाडस होते. या आंदोलनात जनता मोठ्या प्रमाणावर सहभागी झाली. देशभरात ९ लाख लोकांनी स्वतःला अटक करवून घेतली. दुसऱ्या महायुद्धानंतर सन १९४५ मध्ये इंग्लंड सत्ता बदल होऊन मेजर क्लमेंट ॲटली यांच्या नेतृत्वाखाली त्रिमंत्री योजना सुरुवातीपासून भारताला स्वातंत्र्य देण्याबाबत अनुकूल होती. मार्च १९४७ मध्ये पार्लमेंटमध्ये बोलतांना मेजर क्लमेंट ॲटली याने भारताविषयी धोरण स्पष्ट केले. इंग्लंड लवकरच भारताला स्वातंत्र्य देण्याचा प्रयत्न करेल व त्यासंबंधी वाटाघाटी करण्याकरिता भारतात त्रिमंत्री कमिशन पाठविण्यात येईल अशी घोषणा करण्यात आली होती. मेजर ॲटली यांच्या घोषणेनुसार २४ मार्च १९४६ रोजी त्रिमंत्री कमिशन भारतात आले. स्ट्रॅफर्ड क्रिप्स, लॉर्ड पेथिक लॉरेन्स व अलेक्झांडर हे तीन सभासद होते. या त्रिमंत्री कमिशनने राष्ट्रीय काँग्रेसची स्वातंत्र्याची मागणी करून एक योजना मांडली, ही योजना म्हणेजच त्रिमंत्री योजना होय. त्यानंतर २४ मार्च १९४७ रोजी लॉर्ड माऊंटबॅटन भारतात आले. भारतात आल्याबरोबर निरनिराळ्या नेत्यांच्या भेटी घेऊन त्यांनी फाळणीची योजना तयार केली. ३ जून १९४७ रोजी ही योजना प्रसिद्ध करण्यात आली. मुस्लिम लीग व राष्ट्रीय काँग्रेसने या योजनेला मान्यता दिल्यानंतर १८ जुल, १९४७ रोजी ब्रिटिश पार्लमेंटने यांवर ठराव पास केला. ब्रिटिश पार्लमेंटने पास केलेल्या भारताविषयीचा हा ठराव म्हणजे भारतीय स्वातंत्र्याचा कायदा होय. अशा रितीने स्वातंत्र्याच्या कायद्यातील तरतुदीनुसार १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत हा स्वतंत्र झाला.

भारताच्या इतिहासात ९ ऑगस्ट हा दिवस ऑगस्ट क्रांती दिन या नावाने साजरा केला जातो. भारत छोडो आंदोलन ही भारताच्या स्वातंत्र्याच्या लढाईतील एक महत्त्वाची घटना आहे आणि दरवर्षी ९ ऑगस्ट रोजी भारत छोडो आंदोलन दिन म्हणून पण साजरा केला जातो. हा दिवस १९४२ मध्ये महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने ब्रिटीश राजवटीच्या विरोधात जन आंदोलन सुरू केला होता. आजदिनी ८२ व्या ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त शुभेच्छा !

# ‘स्वप्नातील हक्काचे घरकुल’मिळवून देण्याची सेवा संधी परमोच्च आनंददायी-विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार

## ब्रम्हपुरी तालुक्यातील ४६२ घरकुल लाभार्थ्यांना प्रमाणपत्राचे वितरण

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महान संत वाल्मीक ऋषी यांचा वारसा लाभलेल्या भोई समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तथा समाजातील विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील दुर्बल घटक यांची अतिशय हलाखीची परिस्थिती व जिवनमान बघून यांचेकरिता महाविकास आघाडी सरकार काळात या खात्याचा मंत्री असतांना यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना कार्यान्वित केली. आज एकट्या ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्रात हजारोंच्या संख्येने लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळाला. ज्या थोर वाल्मीक ऋषींनी आपल्या रामायणातून संपूर्ण जगाला प्रभू रामचंद्र यांचे दर्शन घडवून दिले. अशा प्रामाणिक समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी आपण सर्वतोपरी सदैव प्रयत्न करणार.तर समाजातील दुर्बल घटकांना त्यांच्या स्वप्नातील हक्काचे घरकुल मिळवून देण्याची सेवा संधी हि परमोच्च आनंददायी असल्याचे प्रतिपादन राज्याचे विरोधी पक्षनेते तथा ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्र आमदार विजय वडेट्टीवार यांनी केले. ते ब्रम्हपुरी येथे आयोजित यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना अंतर्गत मंजूर घरकुल लाभार्थ्यांना प्रमाणपत्राचे वितरण कार्यक्रमात अध्यक्ष म्हणुन बोलत होते.



यावेळी प्रामुख्याने मंचावर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष खेमराज तिडके, बाजार समितीचे सभापती प्रभाकर सेलोकर, माजी जि.प.सदस्य डॉ.राजेश कांबळे, जिल्हा काँग्रेस सचिव विलास विखार, शहर काँग्रेस अध्यक्ष हितेंद्र राऊत, माजी जि.प. सदस्या स्मिता पारधी, माजी पं.स.सदस्य थानेश्वर कायरकर, पं.स.गटविकास अधिकारी रवींद्र घुबडे, भोई समाज नेते डॉ. दिलीप शिवरकर, सीडीसीसी बँक उपाध्यक्ष यशवंत दिघोरे, जिल्हा कॉग्रेस उपाध्यक्ष मोंटु पिलारे, युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सोनू नाकतोडे, माजी नगरसेवक डॉ. नितीन उराडे, महीला काँग्रेसच्या तालुकाध्यक्ष मंगला लोनबले, महीला काँग्रेसच्या शहराध्यक्षा योगिता आमले, कृउबा संचालक ब्रम्हदेव दिघोरे, भोई समाज नेते दिनानाथ वाघमारे, तालुका काँग्रेस उपाध्यक्ष नामदेव लांजेवार, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नानाजी तुपट, मिलींद भन्नारे, सुधीर शिवरकर, प्रामुख्याने उपस्थित होते.

पुढे बोलतांना विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार म्हणाले की, सिंदेवाही शहरातील मेश्राम कुटुंबाची व्यथा बघितल्यानंतर विमुक्त भटक्या जाती व जमातींकरिता विकास योजना आणण्याचा मी संकल्प केला. तर महाविकास आघाडी सरकार काळात मंत्री झाल्यानंतर यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना कार्यान्वित करून हजारोंच्या संख्येने राज्यातील लाभार्थ्यांना स्वप्नातील हक्काची घरे दिली. तर संपूर्ण राज्याच्या तुलनेत ब्रह्मपुरी विधानसभा क्षेत्रात ६३८१ कुटुंबांना या योजनेचा लाभ मिळालेला असून पुढील काळात एकही कुटुंब घरकुला पासून वंचित राहणार नाही. सोबतच ब्रह्मपुरी विधानसभा क्षेत्रात गोसेखुर्दचे आणि शेतीसाठी उपलब्ध करून देऊन या क्षेत्रात शेती समृद्ध क्रांती घडविली. मानवतेचे प्रेम हे सर्वश्रेष्ठ असून माणुसकी हीच जात सर्वात मोठी आहे. म्हणूनच मी मानव सेवेसाठी सदैव अग्रेसर राहून जनतेसाठी हिरीरीने काम करतो असेही ते यावेळी म्हणाले. तसेच इतर घरकुल योजनांमार्फत अनेक लाभार्थ्यांना देखील घरकुले मंजूर करून दिली. येत्या काळात आमची सत्ता येताच महागाईचा विचार करून घरकुलाच्या निधीत दुपटीने वाढ करत ३ लक्ष रुपये करू असे अभिवचन त्यांनी यावेळी उपस्थितांना दिले. यानंतर ब्रम्हपुरी तालुक्यातील एकूण ४६२ घरकुल लाभार्थ्यांना मंजुरीचे प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राहूल मैंद ,तर प्रस्ताविक सुधीर शिवरकर यांनी केले. आयोजित कार्यक्रमास तालुका काँग्रेस कमिटी सर्व सेल पदाधिकारी, ग्राम काँग्रेस कमिटी अध्यक्ष, ग्राम पातळीवरील सर्व सरपंच, ग्रामपंचायत पदाधिकारी, काँग्रेस कार्यकर्ते व हजारोंच्या संख्येने घरकुल लाभार्थी व नागरिक उपस्थित होते.

# धनगर समाज आरक्षण आणि भटक्या विमुक्त जातीच्या प्रश्नावर माजी आ.नारायण पाटील यांनी काय केले

## शिवसेना ओबीसी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब किसवे यांचा सवाल

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा तालुक्यातील जेऊर या ठिकाणी ३ कोटी ४२ लाख रुपयाचा निधी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिला असून हा निधी मिळवण्यासाठी शिवसेना सोलापूर जिल्हा प्रमुख महेश चिवटे यांनी सतत मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा केला. परंतु हा निधी आम्हीच आणला म्हणून खोटारडे- पणा करित रणजीत सिंह मोहिते पाटील आणि माजी आ. नारायण पाटील यांनी नुकतेच या कामाचं भूमिपूजन केले. पण त्याच्या या लबाडीचा भंडाफोड करीत. शिवसेनेच्या वतीने या कामाचे भूमिपूजन सोहळा अधिकृतपणे आम्ही करत आहोत असा दावा बाळासाहेब किसवे यांनी केला.

बाळासाहेब किसवे यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. याप्रसंगी किसवे बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की, या राज्यात प्रचंड मोठया पद्धतीने विकास कामे मुख्यमंत्री शिंदे यांच्या माध्यमातून केले जात आहे. या विकास कामाचाच एक भाग म्हणून चिवटे यांच्या प्रयत्नातुन करमाळा आणि जेऊर येथे हा निधी आला आहे. तर या निधीचा श्रेय लाटण्यासाठी या मंडळी हा खोटारडे पणा चा कळस गाठला आहे. आणि जेऊर व करमाळा परिसरात नारायण पाटील यांनी धनगर समाजाच्या जीवावर आमदारकी मिळवली परंतु नारायण पाटलांनी धनगर समाजच्या आरक्षण प्रश्नात काय योगदान दिले. हे स्पस्ट करावे असा सवाल ही किसवे यांनी उपस्थित करीत. मी धनगर समाजाचा सच्चा सैनिक असून मी समाजासाठी आज ही पक्ष भूमिका बाजूला ठेऊन समाज प्राधान्य ही भूमिका घेतलेली आहे. मात्र याउलट पाटील यांनी धनगर समाज व ओबीसीच्या आरक्षणासाठी भूमिका कधीही घेतली नसल्याचे दिसते आहे. म्हणून येणाऱ्या काळात या परिसरातील बांधवानी मुख्यमंत्री शिंदे आणि शिवसेना पक्ष या सोबत राहावे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून आदिनाथ कारखान्याचे माजी वाईस चेअरमन चंद्रकांत सरडे प्रमुख पाहुणे म्हणूनबसरपंच विलास पाटील यांची उपस्थिती होती. यावेळी जिल्हा प्रमुख महेश चिवटे, महिला जिल्हा प्रमुख आरती बसवनती, जोतीताई शिंदे, युवा सेना जिल्हा प्रमुख प्रियदर्शन साठे, तालुका प्रमुख, बाळासाहेब करचे राहुल कानगुडे नवनाथ गुंड यांच्यासह शिवसेना पदाधिकारी उपस्थिती होते.




## सेलू-झडशी मार्ग देतो अपघातास निमंत्रण

# ठिकठिकाणी खड्डे तर बाजूला वाढले झूडपः प्रशासन सुस्त

**झडशी । प्रतिनिधी**

सेलू मार्गाची दुरवस्था झाली आहे. ठिकठिकाणी खड्डे पडले असून, पावसाच्या पाण्यामुळे खड्याचा अंदाज येत नसल्याने अपघातात वाढ झाली आहे. मात्र प्रशासनाकडून कोणत्याही उपाय योजना करण्यात आल्या नाही. या मार्गावरील खड्डे तातडीने बुजविण्यात यावे, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

ग्रामीण भागातील रस्ते हे दोन गावांना जोडणारे दुवे संबोधले जातात. मात्र, या रस्त्याची गेल्या कित्येक वर्षांपासून डागडुजी न झाल्याने ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. सेलू ते झडसीपर्यंत जाणारा हा रस्ता वडगाव पर्यत खड्यात रस्ता की रस्तात खड्े काही कळायला मार्ग नाही या रस्त्यावरून वाहन चालवन कठीण झाले. असून जीव मुठीत घेऊन या मार्गाने प्रवास करावा लागतो. वडगाव पासून तर झडशी पर्यतरोडवर झूडपे वाढले असून दोन वाहनाना एकमेकांना पास करणे जोखमीचे झाले आहे. तर मोटारस्वार चालकाना हया झुडपाचे चटके खावे लागते. सेलूच्या संताजी सभागृहापासून वडगावपर्यंत रस्त्याची चाळण झाली आहे. अत्यंत महत्त्वाच्या या रस्त्याने मोठ्या प्रमाणात वाहने जातात. सततच्या रहदारीमुळे रस्ता खराब झाला आहे. या रस्त्याची दुरुस्ती करून नव्याने डांबरीकरण करण्यात यावे, अशी मागणी वडगाव( कला) झडशी परिसरातील ग्रामस्थांनी केली आहे.



# ९ ऑगस्ट क्रांती दिनी दिव्यांगांचा एल्गार मोर्चा व तीव्रआंदोलन

**नांदेड । प्रतिनिधी**

दिव्यांग सुधारीत कायदा RPWD ACT - २०१६ सह महाराष्ट्र राज्य दिव्यांग धोरण २०१८ ची नांदेड जिल्ह्यात काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात आली नसल्याच्या निषेधार्थ व सर्व स्थानिक स्वराज्य संस्था नागरी स्वराज्य संस्था आणि आमदार खासदार यांच्याकडील दिव्यांगांचा राखीव निधी अद्याप खर्च न झाल्यामुळे तसेच बोगस दिव्यांग कर्मचाऱ्यांवर अद्याप कुठलीच कारवाई करण्यात आली नसल्यामुळे आणि संजय गांधी निराधार अनुदान योजना व राज्य आणि केंद्र सरकारच्या अर्थसंकल्पात दिव्यांगांसाठी कुठलीच वाढिव तरतुद न केल्याच्या निषेधार्थ व इतर शासन निर्णयीत न्याय मागण्यांसंदर्भात दिव्यांगांनी पुन्हा एकदा आंदोलनाचे हत्यार उपसले आहे.बेरोजगार दिव्यांग कल्याणकृती संघर्ष समीती नांदेड आणि दिव्यांग वृद्ध निराधार मित्र मंडळसह दिव्यांग आघाडी मुखेड यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दिनांक ९ ऑगस्ट रोजी क्रांती दिनी दिव्यांगांचा एल्गार मोर्चा व तिवृ स्वरूपाचे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे.हा मोर्चा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून शुक्रवार दिनांक ९ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा परिषद, महानगरपालिका आणि जिल्हाधिकारी कार्यालयात धडकणार आहे त्यामुळे नांदेड शहर व संपूर्ण नांदेड जिल्ह्यातील दिव्यांगांनी या मोर्चात जास्तीत जास्त संख्येने सहभागी होण्याचे आवाहन बेरोजगार दिव्यांग कल्याणकृती संघर्ष समीती नांदेड आणि दिव्यांग वृद्ध निराधार मित्र मंडळ महाराष्ट्र राज्यसह दिव्यांग आघाडी मुखेड तर्फे आज करण्यात आले आहे.



# शिक्षण विस्तार अधिकारी वसंत मेटकर यांची ‘सेट’ परीक्षेत ‘हॅटट्रीक’

**कंधार । प्रतिनिधी**

कंधार पंचायत समितीच्या विविध विभागांत नेहमीच अभ्यासू व गुणवान अधिकारी सातत्याने नियुक्त होत असतात आपल्या कर्तव्यपरायण आणि अभ्यासू वृत्तीने ते कार्यातून इतरांना प्रेरणा देत असतात. सध्या गटशिक्षणाधिकारी कार्यालय, पंचायत समिती कंधार अंतर्गत बीट उस्माननगरचे उपक्रमशील शिक्षण विस्तार अधिकारी मा.वसंत मेटकर हे सुद्धा त्यापैकीच एक व्यक्तिमत्त्व आहे.

मा.वसंत मेटकर यांनी आत्तापर्यंत वेगवेगळ्या विषयांच्या पात्रता परीक्षा उत्तीर्ण केलेल्या आहेत. त्यांनी एम.ए.(मराठी) या विषयात राष्ट्रीय पात्रता परीक्षा,(नेट)परीक्षा उत्तीर्ण केलेली आहे. त्यानंतर त्यांनी एम.ए.(शिक्षणशास्त्र) व एम.ए.(मराठी), या विषयात (सेट) परीक्षा उत्तीर्ण करून वेळोवेळी आपली पात्रता सिद्ध केलेली आहे. यावर्षी यु.जी.सी.मान्यता प्राप्त सावित्रीबाई फुले विद्यापीठ,पुणे आयोजित राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (सेट) दि.७ एप्रिल २०२४ मध्ये घेण्यात आलेली होती,सदरील परीक्षेत शिक्षण विस्तार अधिकारी वसंत मेटकर यांनी एम.एस.डब्लू(समाजकार्य) या विषयाची राज्य पात्रता परीक्षा,(सेट) परीक्षा उत्तीर्ण करून पुन्हा एकदा तिहेरी (हॅटट्रिक) यश मिळवत, आपली बौद्धिक योग्यता सिद्ध केलेली आहे. यासाठी त्यांना गटशिक्षणाधिकारी मा.संजय येरमे सरांचे वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य लाभलेले आहे.शिक्षणक्षेत्रातील एका ज्ञानजिज्ञासू अधिकाऱ्याने चिकाटी,मेहनत, व अथक परिश्रमाच्या माध्यमातून प्राप्त केलेले यश,हे नेहमीच शिक्षण क्षेत्रातील कार्यरत असलेल्या शिक्षक, विद्यार्थी, कर्मचारी यांना प्रेरणादायी असते, म्हणून राष्ट्रीय पात्रता परीक्षेसह,राज्य पात्रता परीक्षेत तिहेरी यश मिळवणारे मा.वसंत मेटकर यांचे पंचायत समिती कंधार अंतर्गत सर्व केंद्रप्रमुख,सर्व मुख्याध्यापक,व सर्व शिक्षकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# १२ आगस्ट रोजी सिंदी रेल्वेत जन-आक्रोश मोर्चा

## सिंदी रेल्वेला तालुक्याच्या दर्जा देण्यासाठी एकवटली इंडिया आघाडी

## इंडिया अलांयस,सामाजिक संघटनेच्या पदाधिकारी बैठकीत घेण्यात आला निर्णय

**सिंदी रेल्व । प्रतिनिधी**

सिंदी रेल्वे शहरात इंडिया अलांयस, महाविकास आघाडी, सर्व सामाजिक संघटनेच्या पदाधिकार्याची बैठक पार पडली. या बैठकीत सर्वानुमते सिंदी रेल्वे तालुका व्हावा यासाठी सर्व पक्षीय १२ आगस्ट ला भव्य मोर्चाचे करण्याचे आयोजित केले आहे.

या बैठकीचे अध्यक्ष राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष सुनील राऊत, प्रमुख अतिथी प्रदेश सरचिटणीस अतुल वांदिले, माजी नगराध्यक्ष बबनराव हिंगणेकर, शहराध्यक्ष गंगाधर कलोडे, माजी उपाध्यक्ष सुधाकर खेडकर, युवक शहराध्यक्ष तुषार हिंगणेकर, शहर सचिव धनराज झिलपे मंचावर उपस्थित होते.

सिंदी रेल्वे शहर स्वातंत्र्य काळापासून नगर परिषद असलेले सेलू तालुक्यातील एकमेव शहर आहे. सिंदी (रेल्वे) शहराला नगर पालिकेचा दर्जा मिळाला असून येथून पंधरा ते वीस किलोमिटर अंतरावर आहे. या शहराला लागून ३५ ते ४० खेडे गावे आहेत. शहराला तालुक्याचा दर्जा मिळावा याकरिता स्थानिक नागरिकांनी २००४ मध्ये प्रस्ताव शासनाकडे प्रस्ताव सादर केला होता. परंतु त्याचा अनेक वेळा पाठपुरावा केला. त्याचा उपयोग झाला नाही. नंतर २०१३ मध्ये नायब तहसीलदार यांचा बेंच मिळाला. सिंदी रेल्वे नगरपालिकेने कर मध्ये मोठ्या प्रमाणात वाढ केली होती. तेव्हा सर्व पक्षीय मिळून जनआंदोलन केले.भरपावसात हजारो लोकांचा मोर्चा काढला. नंतर शासनाला हि कर वाढीला स्थगिती द्यावी लागली. सिंदी रेल्वे शहरातील नागरिकांना लहान- लहान कामासाठी त्यांच्या मोल मजुरी पाडून सेलू येथे जावे लागते.आंध्र प्रदेश मध्ये देखील दोन राज्य झाले आहे.त्याच धरतीवर सिंदी रेल्वे तालुका होऊ शकतो. यासाठी १२ आगस्ट ला भव्य मोर्चा काढण्याचे आयोजन करण्यात येत आहे असे मनोगत प्रदेश सरचिटणीस अतुल वांदिले यांनी व्यक्त केले.



याबैठकीला फिरोज बेरा, प्रभाकर कलोडे, मोहन अंबोरे, माजी नगरसेवक रामवतार तुरक्याल, देवराव सातपुते, प्रकाश सोनटक्के,माजी सरपंच अरुण भट्ट, माजी नगरसेवक सुमनताई पाटील, मंगल सोनटक्के, गजानन उमाटे, किशोर डफरे,दीपक ठाकरे, बाबाराव भुते, अमित सानिवाल, अरशद कुरेशी, राजेंद्र गोल्हर, गजानन कुबडे, अमोल कांबळे, रविंद्र आदमने,विलास बोकडे, शंकर काटोले, प्रभाकर वानखेडे, विजय मेश्राम, अकील शेख, बाबाराव कुडमती, विनोद दाते, संजय हिंगणेकर, किशोर खडतकर, सुनील शेंडे, अमित कामडी, रंजित मडावी, स्वप्नील घोडे,वसंता सिरसे, हेमराज झाडे, सुमित तळवेकर, सुमित वाघमारे, हेमंत सुतार, राजू तिमांडे, गुड्डू शेख, सोहेल सौदागर, रवी राणा, नितीन भांदककर, बबलू खान, गजानन धाबडधुसके, अरुण बारई, भावराव शहारे, जगदीश बोरकर, आदित्य पेंदाम, अतुल कालबांडे, मंगेश सिडाम, सुरेश बाभले, दिलीप उईके, सुरेंद्र झाडे आदी उपस्थित होते..

# आदिवासी समाजाने मानले ना.सुधीर मुनगंटीवार यांचे आभार

## पोंभुर्णा तालुक्यातील दहा गावांना पेसा लागू करण्यासाठी पुढाकार

## ना.मुनगंटीवार यांच्या उपस्थितीत राज्यपालांना दिले निवेदन





### आदिवासी संस्कृती व परंपरेचे जतन करण्यासाठी सदैव कटिबद्ध

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

आदिवासी समाजाला त्यांचे अधिकार मिळवून देण्यासाठी, त्यांची संस्कृती व परंपरेचे जतन करण्यासाठी पुढाकार घेतल्याबद्दल राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांचे गोंडवाना गणतंत्र पार्टीचे पोंभुर्णा तालुकाध्यक्ष जगन येलके यांनी आदिवासी समाजाच्या वतीने आभार मानले आहेत. राज्यपाल महोदय सी.पी. राधाकृष्णन यांच्यासोबत समाजाच्या विविध मुद्यांवर चर्चा करण्याची व त्यांना निवेदन देण्याची संधी ना. मुनगंटीवार यांच्यामुळे प्राप्त झाल्याबद्दल आदिवासी बांधवांनी कृतज्ञता व्यक्त केली आहे.

पंचायत विस्तार अधिनियम, १९९६ अंतर्गत (पेसा) चंद्रपूर जिल्हयातील पोंभुर्णा तालुक्यातील कसरगट्टा (हेटी), चेकआष्टा, देवई, भटारी, केमारा, चिंतलधाबा - १ , चिंतलधाबा - २ , सातारा तुकुम, सातारा भोसले, खेरगाव ही १० गावे पेसा अनुसुचित क्षेत्र म्हणून घोषित करण्याची विनंती आदिवासी समाजाने केली होती.यासंदर्भातील आदिवासी बांधवासमवेत ना. सुधीर मुनगंटीवार यांनी राज्यपाल महोदयांची आज ०७ ऑगस्ट ला भेट घेतली. मंगळवारी (दि.७) ना. मुनगंटीवार यांच्या उपस्थितीत पोंभुर्णा येथील गोंडवाना गणतंत्र पार्टीचे तालुकाध्यक्ष जगन येलके यांनी राज्यपाल महोदयांना निवेदन दिले. संबंधित दहा गावे पेसा म्हणून घोषित करण्याची मागणी तेथील ग्राम पंचायतींनी शासनाकडे केली आहे. या १० गावांतील अनुसुचित जमातीची लोकसंख्या २०११ च्या जनगणनेनुसार ५० टक्यांपेक्षा जास्त आहे. ही गावे पेसा क्षेत्रात समाविष्ट करण्याबाबतचा प्रस्ताव चंद्रपूर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत आदिवासी विकास विभाग मंत्रालयात सादर करण्यात आला आहे, याचा उल्लेख ना. मुनगंटीवार यांनी आपल्या निवेदनात केला आहे. ना. सुधीर मुनगंटीवार आणि गोंडवाना गणतंत्र पार्टीच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी राज्यपाल महोदयांसोबत विविध विषयांवर चर्चा केली. यावेळी पेसा संदर्भात राज्यपालांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. गोंडवाना विद्यापीठाला आदिवासी विद्यापीठाचा दर्जा देण्यासंदर्भात पुढाकार घेण्याबद्दल मा.राज्यपाल यांनी आश्वस्त केले.त्याबद्दल आदिवासी बांधवांनी विशेष आनंद व्यक्त केला आहे.

#### आमच्यासाठी विजयाचा दिवस

९ ऑगस्ट हा जागतिक आदिवासी दिन आमच्यासाठी विजयाचा दिवस आहे. ना. मुनगंटीवार यांच्या पुढाकारामुळे राज्यपाल महोदयांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. आदिवासी समाजाची अनेक वर्षांपासूनची मागणी पूर्ण होण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे. त्यामुळे यंदाचा जागतिक आदिवासी दिन आमच्यासाठी खऱ्या अर्थाने आनंदाचा आणि विजयाचा दिवस आहे, अशी भावना जगन येलके यांनी व्यक्त केली आहे.

#### राज्यपाल महोदय पोंभुर्णा येथे येणार

दिवाळीच्या कालावधीत राज्यातील आदिवासी भागाचा दौरा करतांना पोंभुर्णा तालुक्यात आदिवासी पारंपारीक उत्सवात उपस्थित राहण्याची ग्वाही, राज्यपाल महोदयांनी ना. मुनगंटीवार व जगन येलके आणि उपस्थित गोंडवाणा गणतंत्र पार्टीच्या पदाधिकाऱ्यांना दिली. आदिवासी समाजाची संस्कृती जोपासण्यासाठी सर्व प्रयत्न होतील, असेही राज्यपाल महोदयांनी यावेळी सांगितले.

#### आदिवासी समाजाचा विकास कायम अजेंड्यावर

आदिवासी समाजाला आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी मी कटिबद्ध आहे. आदिवासी समाजातील तरुण आज प्रत्येक क्षेत्रात मोठे नाव कमावत आहेत. त्यांच्या प्रगतीला चालना देणे आणि एकूणच आदिवासी समाजाचा विकास करणे कायम अजेंड्यावर राहील, अशी प्रतिक्रिया ना. सुधीर मुनगंटीवार यांनी दिली आहे.

## हिरापुर येथे पार पडली शिक्षण परिषद

**चिमूर । प्रतिनिधी**

शिक्षकांनी नवनविन तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि गुणवत्ता पुर्ण शिक्षण द्यावे, असे आवाहन शंकरपुर बिटाचे नवनियुक्त बिट विस्तार अधिकारी स्वप्निल खांडेकर यांनी केले आहे.

चिमुर पंचायत समिती अंतर्गत, हिरापुर व साठगाव केंद्राची संयुक्त शिक्षण परिषद, समुह साधन केंद्र हिरापूर येथे आयोजित करण्यात आली. पहिल्या केंद्रस्तरीय शिक्षण परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्ष स्थानी हीरापुर च्या सरपंच मंदा उरकुडे, ग्रामपंचायत सदस्य दिपक नगराळे, बिंदेश्वरी मोरकर प्रमुख अतिथी म्हणून केंद्रप्रमुख दादाराव परचाके, अशोक गायकवाड, हिरापुर शाळेचे मुख्याध्यापक प्रबुद्ध डांगे उच्च श्रेणी मुख्याध्यापक सुनंदा व्याहाळकर, घनश्याम महाजन, सुखराम खेळकर यांची मार्गदर्शक म्हणून उपस्थिती होती.

शैक्षणिक गुणवत्ता विकास जिल्हा स्वाध्याय पत्रिका, इयत्ता निहाय अध्ययन निष्पत्ती, गणवेश सन २४ -२५, प्रधानमंत्री पोषण शक्ती योजने अंतर्गत परसबाग, स्काऊट गाईड, वर्ग खोल्यांची स्थिती, स्वच्छतागृह उपलब्धता, स्वच्छता मानिटर उपक्रम अध्ययन अध्यापन साहित्य मांडणी व, उपयोग, दप्तराचे ओझे कमी करणे, पाठ्यपुस्तकातील कोऱ्या पानांचा उपयोग, विद्यार्थी उपस्थिति व आधार नोंदणी, आनंददायी शनिवार, शाळेची वेळ, मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा भाग २, विनोबा ऍप रजिस्ट्रेशन या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. याच कार्यक्रमात जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेमधून सेवानिवृत्त झालेले पदवीधर शिक्षक विठ्ठलराव उताने यांचा शंकरपुर बिटाचे वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन सचिन शेरकी आभार राजकुमार खोब्रागडे यांनी केले.. यशासितेसाठी भिमराव शेंडे, शारदा वावरकर, अश्विनी भुते घनश्याम महाजन आदि शिक्षकांनी सहकार्य केले. हिरापूर साठगाव केंद्रातील ६७ शिक्षक वृंद व गावकरी हजर होते.



## आदर्श पदवी महाविद्यालयात नवागत प्रवेशित विद्यार्थ्यांचा स्वागत व संवाद समारोह संपन्न




**गडचिरोली । प्रतिनिधी**

गोंडवाना विद्यापीठातील आदर्श पदवी महाविद्यालयात शैक्षणिक सत्र २०२४-२५ मध्ये विविध अभ्यासक्रमात नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचे स्वागत व संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाला आदर्श पदवी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. कृष्णा कारु, प्रा. प्रशांत ठाकरे, प्रा. संजय डाफ, प्रा. मेश्राम, महाविद्यालयाचे समन्वयक भरत घेर तसेच विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

नवागत प्रवेशित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना आदर्श पदवी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. कारु यांनी महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांना महाविद्यालयात सुरु असलेले विविध अभ्यासक्रम, सदर अभ्यासक्रमाबाबत माहिती, त्यांचे महत्व आणि भविष्यात होणारे फायदे आणि उपयोग याबाबत विस्तृत माहिती दिली. तसेच विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांच्या वाढीसाठी महाविद्यालय कसे प्रयत्नशील आहे याचे दाखले दिले. प्रास्ताविक महाविद्यालयाचे समन्वयक भरत घेर यांनी केले. तसेच कार्यक्रमाचे सचालन प्रा. प्रिती भांडेकर, प्रा. रेणुका गव्हारे यांनी तर आभार प्रा. सुदर्शन जानकी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील सहायक प्राध्यापक, सह समन्वयक यांनी सहकार्य केले.

## भाजपा नेते गणेश चिवटे यांच्या नेतृत्वात भाजपा कामगार आघाडीच्या निवडी संपन्न

**करमाळा । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीचे जिल्हा सरचिटणीस गणेश चिवटे यांच्या नेतृत्वात भाजपा कामगार आघाडीच्या करमाळा तालुक्याच्या निवडी संपन्न झाल्या. भाजपाचे तालुकाध्यक्ष रामभाऊ ढाणे यांच्या अध्यक्षतेखाली कामगार आघाडीचे तालुकाध्यक्ष गणेश माने यांनी या निवडी करमाळा भाजपा संपर्क कार्यालयात जाहीर केल्या.

यामध्ये कामगार आघाडीच्या तालुका सरचिटणीसपदी सतीश लक्ष्मण कोल्हे - पांडे व श्री सुनील रघुनाथ आलाट - रोशेवाडी यांची निवड केली तर कामगार आघाडीच्या सोशल मीडियाच्या तालुका अध्यक्षपदी विठ्ठल मंडलिक - रायगाव व उपाध्यक्षपदी दादासो संभाजी कडू- पोथरे यांना निवडीचे पत्र देण्यात आले. यावेळी भाजपा शहराध्यक्ष जगदीश आग्रवाल, करंजे ग्रामपंचायतचे सरपंच काकासाहेब सरडे, सरचिटणीस नितीन झिंजाडे, संजय किरवे, नितीन कांबळे, गणेश झिंजाडे, ऋषी निंबाळकर, ज्ञानेश्वर कडु ,शरद यादव ,उमेश झिंजाडे,मयूर आलाट, विठ्ठल आलाट,शुभम गोरे,जयकुमार चव्हाण,गणेश कांबळे, दादा चव्हाण, दत्ता शिंदे, राजु पवार,लखण पवार ,तानाजी पवार,दादा पवार ,प्रविण कांबळे,सचिन पवार ,राजेंद पवार ,भाऊ पवार आदी मान्यवर उपस्थित होते.



## क्रांतीदिनाचे औचित्य साधून 'अबे पोट्टे हो फ्रेम नितेश कराळे मूल नगरीत'

**मूल । प्रतिनिधी**

०९ ऑगस्ट क्रांतीदिनाचे औचित्य साधून संतोषसिंह रावत मित्र परिवार यांच्या वतीने गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळा तथा विद्यार्थी मेळावा शुक्रवार दिनांक ०९ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता कर्मवीर कन्नमवार सभागृह मूल येथे आयोजित करण्यात आला आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटक डॉ.एन.एस.कोकोडे निवृत्त संचालक गोंडवाना विद्यापीठ,कार्यक्रमाचे अध्यक्ष संतोषसिंह रावत अध्यक्ष चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक,मुख्य मार्गदर्शक नितेश कराळे फिनिक्स अकॅडेमी वर्धा,मुख्य मार्गदर्शक डॉ.प्रशांत ठाकरे सहाय्यक प्राध्यापक गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली,प्रमुख उपस्थिती संदीप गड्डमवार अध्यक्ष भारत शिक्षण मंडळ सावली,प्रमुख उपस्थिती ड.अनिल वैरागडे अध्यक्ष शिक्षण प्रसारक मंडळ मूल कार्यक्रमाला प्रामुख्याने लाभणार आहेत.

शैक्षणिक दृष्ट्या जीवनाला नवी दिशा आणि प्रेरित करण्यासाठी आयोजित कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संतोषसिंह रावत मित्र परिवार यांनी केले आहे.

# अखेर पोटेगाव बंधारा दुरुस्तीच्या कामास प्रशासकीय मान्यता मिळाली

## अनेक अडथळ्यांची शर्यत पार करण्यास आमदार संजयमामा शिंदे यांना यश

**करमाळा । प्रा राजेश गायकवाड**

करमाळा तालुक्यातील सीना नदीवरील अत्यंत महत्त्वाचा असलेल्या पोटेगावच्या कोल्हापुरी पद्धतीच्या बंधाऱ्याच्या दुरुस्तीसाठी ४ कोटी ८ लाख निधीस प्रशासकीय मान्यता मिळाली असून लवकरच त्याची निविदा प्रसिद्ध होऊन ऑक्टोबर २०२४ पूर्वी प्रत्यक्ष कामाला सुरुवात होईल अशी माहिती करमाळा मतदारसंघाचे आ.संजयमामा शिंदे यांनी दिली.

याविषयी अधिक माहिती देताना आमदार शिंदे म्हणाले की, पोटेगाव हा अत्यंत महत्त्वाचा कोल्हापूर पद्धतीचा बंधारा अनेक वर्षापासून दुरुस्तीच्या प्रतीक्षेमध्ये होता. सिंचन बजेट मधून त्याला दुरुस्ती करण्यास निधी उपलब्ध नसल्यामुळे कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या मुख्य अभियंत्यांना आपण विस्तार सुधार मधून त्याचा प्रस्ताव दाखल करण्याच्या सूचना दिलेल्या होत्या. त्यानुसार कृष्णा खोरे विकास महामंडळाचे मुख्य अभियंता श्री धुमाळ यांनी १५ सप्टेंबर २०२२ रोजी प्रत्यक्ष पोटेगाव बंधाऱ्याची पाहणी केली त्यानंतर प्रस्ताव दाखल होऊन २५ नोव्हेंबर २०२२ रोजी च्या कार्यकारी समितीच्या १६६ व्या बैठकीत सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन प्रस्ताव नियामक मंडळापुढे मांडण्यासाठी जानेवारी २०२३ मध्ये शासनास सादर करण्यात आला. प्रस्ताव दाखल झालेला होता परंतु जलसंपदा मंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची बैठक होत नसल्यामुळे विषय प्रलंबित होता, त्यामुळे दिनांक ७ मार्च २०२३ रोजी फडणवीस साहेबांना आपण लेखी पत्र देऊन नियामक मंडळाची बैठक लवकरात लवकर घेऊन पोटेगाव या कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याचा विषय मार्गी लावावा अशी विनंती केली होती.महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाची ११०वी बैठक २८ डिसेंबर २०२३ रोजी झाली आणि त्यामध्ये ४१२.९२ लक्ष निधीला मंजूर देण्यात आली.आज

महाराष्ट्र शासन जलसंपदा विभाग,शासन निर्णय क्रमांक: प्रमाप्र-२०२४/ (प्र.क्र.२१९/२०२४)/ सिंव्य दिनांक:- ७ ऑगस्ट, २०२४ रोजी बंधाऱ्याच्या दुरुस्तीसाठी ४ कोटी ८ लाख निधीस प्रशासकीय मान्यता मिळाली.या निधीमधून पोटेगाव बंधाऱ्याच्या दुरुस्तीचे काम केले जाणार आहे.या बंधार्याचा फायदा पोटेगाव, बाळेवाडी पोथरे ,बिटरगाव श्री, तरटगाव ,निलज या ६ गावांना होणार असून एकूण ८१५ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे.



#### पोटेगाव बंधाऱ्याचा इतिहास...

पोटेगाव या कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यासाठी दिनांक २१ एप्रिल १९८१ च्या शासन निर्णयानुसार २४ लाख ६१ हजार इतक्या किमतीस प्रशासकीय मान्यता दिलेली होती. सदर काम जानेवारी १९८८ मध्ये सुरू होऊन ऑगस्ट १९९० मध्ये पूर्ण करण्यात आले होते. त्यानंतर प्रकल्प सिंचन व्यवस्थापन विभागाकडे सन १९९३ मध्ये हस्तांतरित करण्यात आला होता.तेंव्हापासून हा बंधारा दुरूस्ती च्या प्रतिक्षेत होता.

## असंख्य कार्यकर्त्यांचा संजय शिंदे गटाला राम राम

# भाजप युवा नेते दिग्विजय बागल यांच्या प्रमुख उपस्थितीत बागल गटात जाहीर प्रवेश

## बागल गटाच्या मेळाव्यास गावपातळीवर उत्सूर्फ प्रतिसाद

**करमाळा । प्रतिनिधी**

अंजनडोह येथील युवा नेते उमेश रणदीवे, आप्पा रणदिवे,ज्ञानेश्वर रणदीवे यांच्यासह ४० प्रमुख कार्यकर्त्यांचा शिंदे गटाला राम राम करत मकाईचे मा.चेअरमन दिग्विजय बागल यांच्या उपस्थितीत कंदर येथील कार्यकर्ता मेळाव्यात बागल गटात जाहीर प्रवेश केला.मकाईचे मा. चेअरमन दिग्विजय बागल यांच्या नेतृत्वाखाली बागल गटाच्या कार्यकर्ता मेळाव्याला दिवसेंदिवस प्रतिसाद वाढत आहे.युवा नेते दिग्विजय बागल यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत बागल गट प्रणीत भारतीय जनता पक्षात सर्व मतभेद विसरुन गावोगावी होणाऱ्या प्रत्येक मेळाव्यात प्रवेश करणाऱ्यांची संख्या वाढत चालली आहे.करमाळा तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी दुरावलेल्या सर्व सहकार्यांना विधानसभा निवडणुकीपर्यंत सोबत घेणार असल्याचा निर्धार करत रश्मी बागल यांना विधानसभेत पाठवण्याचे आवाहन भाजपचे युवा नेते दिग्विजय बागल करत आहेत.

यापूर्वी वीट येथील मेळाव्यात पोंधवडी गावचे युवा नेते अमोल गाडे यांनी तर सालसे येथील



तानाजी लोकरे यांनी केतूर येथील मेळाव्यात जाहीर प्रवेश केला आहे.तसेच सोगाव ग्रा.पंचायत मा.सरपंच कृषि उत्पन्न बाजार समितीचे मा.संचालक कैलास पाखरे यांनी वाशिंबे येथील मेळाव्यात जाहीर प्रवेश केला आहे.तर शेटफळ येथील मेळाव्यात रामवाडीचे मा.सरपंच संतोष वारगड,जिंतीचे अंकुश महाराज खराडे, सिकंदर शेख, तसेच निमगाव ह.येथील मेळाव्यात हिवरेचे मा. सरपंच बापू फरतडे, यांनी जाहीर प्रवेश केला आहे. यावेळी भाजप नेते दिग्विजय बागल,कृषि उत्पन्न बाजार समिती मा.सभापती प्रा.शिवाजीराव बंडगर, मा. उपसभापती चिंतामणी जगताप, संतोष वारगड यांनी आपले मनोगत व्यक्त केले.या कार्यक्रमाला माजी सरपंच साधना खरात, श्री.मकाईचे चेअरमन दिनेश भांडवलकर,मा.सभापती शिवाजीराव बंडगर,मा.उपसभापती चिंतामणी जगताप,आदिनाथचे मा. व्हाईस चेअरमन.नानासाहेब लोकरे,रंगनाथ शिंदे, कुलदीप पाटील,उद्धव भोसले,बापूमामा कदम,सुभाष पवार,नवनाथ बागल,सतिश नीळ,अजित झांजूर्ने,रेवन्नाथ निकत,अशिष गायकवाड,राजेंद्र मोहोळकर गणेश तळेकर , पै.अनिल शिंदे, अशोक पाटील,महेश तळेकर,विलास काटे,डॉ.विजय रोकडे,युवराज रोकडे,अँड.सोनवणे,अँड.जयदीप देवकर,सचिन पिसाळ, माजी सभापती लक्ष्मण महाडिक,रावू काका देशमुख,स्वप्निल गोडगे,युवराज मगर, बाळासाहेब पराडे, धर्मराज लोकरे, सागर शिंदे,कुबेर शिंदे,मच्छिंद्र वागज, बंकट शिंदे, आण्णासाहेब शिंदे, सुभाष पवार, वि.का.सोसायटीचे चेअरमन आबा लोकरे, अरुण सरडे, विलास लोकरे, परशुराम शिंदे, संतोष माने, भैरवनाथ डोके, ब्रह्मदेव आरकीले,गोवर्धन माने, सोमनाथ माने, रवी माने, पांडुरंग पराडे, विवेक भोसले, वैभव पराडे, विजय माने, लालू जहागीरदार, शामिद भाई इनामदार, मुदूभाई जहागीरदार, मधुकर भगत, राजकुमार लांडगे, माजी सरपंच धर्मराज जगताप, आजिनाथ जगताप, दत्ता मामा साळुंखे, आदी प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन सागर शिंदे यांनी केले तर सुभाष पवार यांनी मानले.

**बागल गटात प्रवेश सत्र सुरू**

> **बागल गटापासून दूरावलेले गाव पातळीवरील अनेक प्रमुख कार्यकर्ते फोन करुन तर अनेक जन प्रत्यक्ष भेट घेऊन रश्मी दिदि बागल यांना विधानसभेत पाठविण्यासाठी स्व.बागल मामांच्या विचारधारेला मानून काम करण्याची इच्छा व्यक्त करत आहेत.अशा सर्व हितचिंतकांना येत्या काळात बरोबर घेऊन राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या माध्यमातून रिटेवाडी उपसा सिंचन योजना,एमआयडीसी,मांगी तलाव,केम वडशिवने उपसा सिंचन, सीना कोळगाव धरणग्रस्त शेतकऱ्यांना पर्यायी जमीन वाटप होणे,उजनी जलाशयावरील पूल,आरोग्य,रस्ते, ववीज अशा विविध प्रश्न मार्गी लावण्यासाठी करमाळा तालुक्यातील मातब्बर मंडळी प्रवेश करणार .**
>
> **–दिग्विजय दिगंबरराव बागल.**
> **मा. चेअरमन मकाई सहकारी साखर कारखाना**



सह्याद्रीचा राखणदार सोबत सी डी सी सी बँकेचे अध्यक्ष संतोषसिंग रावत, व्हॉईस ऑफ मिडियाचे जिल्हाध्यक्ष संजय पडोळे, काँग्रेस तालुका अध्यक्ष गुरुदास गुरूनुले, सह्याद्रीचा राखणदार चे संपादक आशिष घुमे, जाहिरात विभाग प्रमुख वैभव शहाणे,तालुका प्रतिनिधी रोहित कामडे.



सह्याद्रीचा राखणदार सोबत मूल तालुका प्रतिनिधी रोहित कामडे, संपादक आशिष मारोती घुमे, जाहिरात विभाग प्रमुख वैभव शहाणे



पोंभूर्णा:- सह्याद्रीचा राखणदार सोबत पोंभूर्णा तालुका प्रतिनिधी सचिन मडावी



गोंडपिंपरी :– सह्याद्रीचा राखणदार सोबत प्रभारी जिल्हा प्रतिनिधी तथा उपसंपादक सूरज माडूरवार, व अन्य मान्यवर



माढेळी:- सह्याद्रीचा राखणदार सोबत सरपंच देवानंद महाजन व ईतर मान्यवर



माढेळी:– सह्याद्रीचा राखणदार सोबत माजी आ.ॲड. वामनराव चटप, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रकाशबाबू मुथा व अन्य मान्यवर

# जिल्हा वार्षिक योजनेच्या ३४५ कोटीच्या कामांना मान्यता–पालकमंत्री संजय बनसोडे

**परभणी । प्रतिनिधी**

जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत सन २०२४-२५ या आर्थिक वर्षांत नागरिकांना मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यासह विविध योजनासांठी ३४५ कोटी रुपयांच्या विकास कामांस जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समितीच्या सभागृहात पालकमंत्री संजय बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समिती बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी खासदार संजय जाधव, सर्वश्री आमदार राजेश विटेकर, सुरेश वरपुडकर, डॉ. राहूल पाटील, रत्नाकर गुट्टे, जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी, मुख्य कार्यकारी अधिकारी रश्मी खांडेकर, मनपा आयुक्त तृप्ती सांडभोर, अपर जिल्हाधिकारी डॉ. प्रताप काळे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी यांची प्रमुख उपस्थिती होती. पालकमंत्री श्री. बनसोडे यांनी जिल्ह्यातील स्थानिक गरजा लक्षात घेवून लोकप्रतिनधींशी समन्वय साधून विकास कामांचे प्रस्ताव तयार करावेत. सन २०२३-२४ आणि २०२४-२५ या दोन वर्षाच्या विकास कामांच्या खर्चास मान्यता प्रदान केली असल्याचे सांगून, जिल्हाधिकारी यांनी बँक अधिकारी, कृषि विभाग, पीक विमा कंपन्याची प्रतिनिधी आणि महावितरण तसेच संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची आठवड्याभरात आढावा बैठक घेऊन पीक विमा योजना, सततच्या पावसामुळे पिकांचे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करावेत. अखंडीत वीज पुरवठा, ग्रामीण भागातील रोहीत्र शेतकऱ्यांची कोणतीही अडवणूक न करता बसवून द्यावीत, बँकांनी विनाव्यत्यय पीककर्ज उपलब्ध करून देण्याचे निर्देश त्यांनी दिले. जिल्ह्याच्या विकास कामाशी निगडीत कोणतीही अडचण येत असल्यास तसेच मंत्रालय स्तरावर आढावा बैठक घेऊन सोडविण्याला प्राधान्य देण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले. यावेळी परभणी शहरातील विकास कामे तसेच मूलभूत सोयी सुविधांबाबत सर्व लोकप्रतिनिधींनी महानगरपालिका आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या विरोधात नाराजी व्यक्त केली. तसेच शहरातील नागरिकांना आठवड्यातून दोन-तीन दिवस पिण्याचे शुध्द पाणी, अंतर्गत व रस्ते, भूमिगत गटार योजनेला प्राधान्य देवून त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यमंत्री यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येईल, अशी ग्वाही ही पालकमंत्री संजय बनसोडे यांनी यावेळी दिली. यावेळी पालकमंत्री श्री. बनसोडे यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना, मुख्यमंत्री वयोश्री योजना, मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना, मुलींना ५० टक्केऐवजी १०० टक्के शुल्क माफी योजना आणि मुख्यमंत्री अन्नपुर्णा योजना या राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजनांचा संबंधित विभागप्रमुखांकडून कामकाजाच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेतला. प्रारंभी जिल्हा नियोजन समितीच्या दिनांक ८ जानेवारी, २०२४ रोजी पार पडलेल्या बैठकीतील मुद्यांबाबत अनुपालन अहवालास मान्यता देण्यात आली. जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२३-२४ मध्ये योजनानिहाय संबंधीत कार्यान्वयीन यंत्रणाच्या स्तरावर प्रशासकीय मान्यता प्रदान न करता केवळ आहरीत करून ठेवलेल्या १२७ कोटी रुपयांच्या निधीस जिल्हा नियोजन समितीने मान्यता प्रदान केली. तसेच जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण २०२३-२४ अंतर्गत शासनाकडून अर्थसंकल्पीय तरतूद रुपये २९० कोटीपैकी २८१.१९ कोटी (९६.९६ टक्के) बीडीएस प्रणालीवर झालेल्या खर्चास जिल्हा नियोजन समितीने मान्यता प्रदान केली.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .